## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ४२७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२०/०७/२०१६.

**१) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १७/०७/२०१६ रोजी ०७.०० वा. ते १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय १६ वर्ष, ही आपल्या घरी एकटीच घरी हजर असतांना कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेले. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मडावी पो.स्टे. साकोली हे करीत आहे.

**२) महीलेस लैंगिक सतावणुक केल्याने गुन्हा नोद . :—**

दिनांक १९/०७/२०१६ रोजी १७.०० वा. ते २०.३० वा. दर. यातील फिर्यादी ही आपल्या राहते घराचे मागे वाडीत ठेवलेला प्लास्टीक मेन कापड आनण्या करीता गेली असता तिला पाहुन आरोपी क्र. १ रतनदास नानु कोटांगले वय ३० वर्ष याने ''हे निशाबाई माझ्या कडे पाहा असे म्हटले'' असता तिने त्याच्याकडे पाहीले व त्याने अश्लिल कृत्य दाखवुन व लैंगिक सतावणुक केली व याच कारणा वरून फिर्यादीचा भाऊ अनमोल याने आरोपी क्र. १ यास हटकले असता आरोपी क्र. २ नानु रामा कोंटागले वय ६५ वर्ष याने अनमोल यास शिविगाळ व काठीने मारपीट करुन किरकोळ जखमी केले. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५४(अ)(३),५०९,३२३,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो. स्टे. साकोली हे करीत आहे.

**३) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :—**

दिनांक २०/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, लाखनी, अडयाळ, भंडारा व गोबरवाही येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २२ लिटर हातभट्टी दारू कि. ९५०/रु. व ८८० मिली. लिटर देशी दारु. कि. १७५०/रु. तसेच जुगारातुन कि. ८४५/— रु. असा एकुण कि. २,५९५ /—रू. चा माल जप्त करण्यात आला.

२०/७/२०१६

**( श्री.बी.आर.गाडे)**
**प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा.**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.

२०/७/१६.